**<u>ठळक बातम्या</u>**

- अमेरिकेत सरसकट १० टक्के आयात शुल्क लागू करण्याचा अध्यक्ष ट्रंप यांचा अंतरिम आदेश जारी

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची ब्राझीलचे राष्ट्राध्यक्ष लुईझ इनासिओ लुला दा सिल्वा यांच्याशी महत्त्वाच्या विषयांवर द्विपक्षीय चर्चा

- एआय इंपॅक्ट समिटमधे युवक काँग्रेसने केलेल्या निदर्शनांविरोधात भाजयुमोचं देशभर आंदोलन/ भिवंडी न्यायालयात आलेले राहुल गांधी यांचं काळ्या झेंड्यांनी स्वागत

**आणि**

- टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत सुपर एट गटाचे सामने आज पासून सुरु

**<><><><><>**

अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयानं ट्रम्प यांनी जगभरातल्या देशांवर लादलेलं शुल्क असंवैधानिक असल्याचा निर्णय दिल्यानंतर, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जागतिक पातळीवर १० टक्के आयात शुल्क लागू करण्याचा आदेश जारी केला आहे. या आदेशावर ट्रम्प यांनी स्वाक्षरी केली असून, तो तातडीनं लागू होणार आहे. भारतासह जगभरातल्या इतर देशांसाठीही हा आदेश लागू असेल. या आदेशामुळे भारतावरचं आयात शुल्क तात्पुरत्या स्वरूपात १० टक्क्यांपर्यंत खाली येईल असा खुलासाही ट्रम्प यांच्या प्रशासनानं केला आहे.

आयात शुल्काबाबत सर्वोच्च न्यायालयानं दिलेला निकाल निराशाजनक असल्याचं ट्रम्प यांनी म्हटलं आहे. न्यायालयानं आपली बाजू योग्य रितीनं ऐकून घेतली नाही अशी टीकाही त्यांनी केली आहे.

न्यायालयाच्या निर्णयानंतरही भारतासोबतच्या व्यापार करारात कोणताही बदल झालेला नाही, हा करार कायम आहे असं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी स्पष्ट केलं आहे. भारतासोबत आपले संबंध उत्तम असल्याचंही त्यांनी म्हटलं आहे.

दरम्यान, भारत आणि अमेरिका व्यापार कराराला अंतिम स्वरूप देण्यासाठी काम करत असल्याचं परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जैस्वाल यांनी वार्ताहरांशी बोलतांना सांगितलं की. भारताचं एक शिष्टमंडळ पुढच्या आठवड्यात अमेरिकेचा दौरा करणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि ब्राझीलचे राष्ट्राध्यक्ष लुईझ इनासिओ लुला दा सिल्वा यांच्यात नवी दिल्ली इथं द्विपक्षीय चर्चा झाली. या बैठकीत दोन्ही नेत्यांनी परस्परांमधील द्विपक्षीय संबंधांचा आढावा घेतला. बहुपक्षीय मंचावर परस्पर सहकार्य, बहुपक्षीयतेमधल्या सुधारणा, जागतिक प्रशासन आणि ग्लोबल साउथ अंतर्गत येणाऱ्या देशांशी संबंधित मुद्दे अशा परस्पर हिताच्या मुद्यांवरही दोन्ही नेत्यांनी चर्चा केली.

त्याआधी आज सकाळी राष्ट्राध्यक्ष लुला दा सिल्वा यांचं आज नवी दिल्लीत राष्ट्रपती भवन इथं समारंभपूर्वक स्वागत केलं गेलं. परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांनीही त्यांची भेट घेतली. या भेटीत ब्राझीलच्या राष्ट्राध्यक्षांनी दोन्ही देशांमधली धोरणात्मक भागिदारी दृढ करण्याबद्दल उत्सुकता दाखवल्याचं तसंच याबद्दल मार्गदर्शन केल्याचं जयशंकर यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज गुवाहाटी इथं केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या ८७ व्या स्थापना दिनाच्या कार्यक्रमात सहभाग झाले. यावेळी त्यांनी पोलीस दलाच्या संचलनाचं निरीक्षण केलं. यावेळी त्यांनी सीआरपीएफच्या कार्याची प्रशंसा केली ते म्हणाले…

**होल्ड बाईट...**

**<><><><><>**

हिमाचल प्रदेशात कसौली इथल्या केंद्रीय संशोधन संस्थेत केंद्रीय आरोग्य मंत्री जे. पी. नड्डा आज धनुर्वात आणि घटसर्प प्रतिबंधक लसीकरण मोहिमेची सुरुवात करतील. टीडी नावाची ही लस या दोन्ही जीवघेण्या आजारांपासून संरक्षण करते.

**<><><><><>**

पाचव्या गोवा नौवहन संमेलनाचं उद्घाटन आज नौदलप्रमुख ॲडमिरल दिनेश त्रिपाठी यांच्या हस्ते झालं. हिंद महासागराच्या किनाऱ्यावरल्या १४ देशांना या संमेलनाने एकत्र आणलं असून यामुळे या देशांसमोरच्या आव्हानांवर चर्चा करण्यासाठी व्यासपीठ मिळालं आहे, असं त्यांनी नमूद केलं. यावेळी त्रिपाठी यांनी नौवहन क्षेत्रात सहकार्याचं महत्त्व विषद केलं. विशाखापट्टणम इथं नुकत्याच झालेला ७४ देशांचा मेळावा हा सागरी महाकुंभ होता असं ते यावेळी म्हणाले. जगाचा ७० टक्के भूभाग हा पाण्याने आच्छादलेला असून जवळपास ६८ टक्के मालवाहतूक समुद्र मार्गे होते असं सांगत त्यांनी समुद्र मार्गाचं महत्त्व अधोरेखित केलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या, आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रम श्रृंखलेचा १३१ वा भाग

असेल. सकाळी ११ वाजता प्रसारित होणारा हा कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्या, तसंच न्यूज ऑन ए आय आर ॲप वरुन ऐकता येईल.

<><><><><>

नवी दिल्लीत आयोजित एआय इंपॅक्ट परिषदेत तंत्रज्ञानातल्या वेगवेगळ्या अडचणींवरचे उपाय मांडण्यात आल्याचं केंद्रीय माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटलं आहे. वैष्णव यांनी आज सकाळी भारत मंडपम् इथं जाऊन सहभागी नवोन्मेषकर्मींबरोबर संवाद साधला. प्रदर्शनस्थळी युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी काल निदर्शनं करीत गदारोळ केल्याप्रकरणी ते म्हणाले, की काँग्रेस अतिशय हीन दर्जाचं राजकारण करत असून ही त्या पक्षासाठी लाजिरवाणी बाब आहे. काँग्रेस युवाविरोधी आणि नवोन्मेष विरोधी असल्याचा आरोप त्यांनी केला.

कांग्रेसच्या कालच्या कृतीमुळे सारा देश शोकसंतप्त असल्याचं भाजपा प्रवक्ते सुधांशु त्रिवेदी यांनी पत्रकारपरिषदेत सांगितलं. काँग्रेस देशाचा अपमान करत असल्याचा आरोप त्यांनी केला. भारत मंडपम् इथं एआय इंपॅक्ट परिषदेत युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी निदर्शनं केल्याच्या निषेधात भारतीय जनता पार्टीच्या युवा मोर्चाने आज देशभरात निदर्शनं केली.

<><><><><>

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यकर्त्याने दाखल केलेल्या मानहानीच्या खटल्यासाठी काँग्रेस नेते राहुल गांधी आज ठाणे जिल्ह्यातल्या दंडाधिकारी न्यायालयासमोर हजर झाले. २०१४च्या लोकसभा निवडणुकीदरम्यान सोनाळे या गावातल्या सभेत राहुल गांधी यांनी संघाबाबत केलेल्या वक्तव्यावर आक्षेप घेत एका कार्यकर्त्याने त्यांच्या विरोधात मानहानीचा खटला दाखल केला होता. माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील हे या प्रकरणी राहुल गांधी यांना जामीन होते. मात्र, गेल्या

वर्षी त्यांचं निधन झाल्यामुळे नवीन जामीन सादर करण्याचे निर्देश भिवंडी दंडाधिकारी न्यायालयाने दिले होते. त्यानुसार, राहुल गांधी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांना नवीन जामीन म्हणून सादर करतील. दरम्यान, एआय इम्पॅक्ट समिटमधल्या काँग्रेसच्या निषेधाला प्रत्युत्तर म्हणून भाजप कार्यकर्त्यांनी राहुल गांधी यांना काळे झेंडे दाखवले.

<><><><><>

ऑपरेशन सिंदूर' मधे विशेष उल्लेखनीय कामगिरी बजावल्याबद्दल महाराष्ट्र सदनचे गुंतवणूक निवासी आयुक्त  सुशील गायकवाड यांना भारतीय लष्कर प्रमुखांचे प्रशंसा पदक मिळालं आहे. संरक्षण मंत्रालयाच्या  ऑपरेशन आणि लॉजिस्टिक्स संचालनालयात कार्यकारी संचालक म्हणून कार्यरत असताना २०२५ मधे या मोहिमेत त्यांनी दळणवळण व्यवस्थापनात महत्त्वाची  कामगिरी बजावली होती.  नवी दिल्लीत  संरक्षण मंत्रालयात आयोजित सोहळ्यात लष्कर उपप्रमुख लेफ्टनंट जनरल पुष्पेंद्र सिंह यांच्या हस्ते पदक प्रदान करण्यात आलं.

<><><><><>

संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेत सुधारणांची तातडीने गरज असल्याचा पुनरुच्चार भारताने केला आहे. शांतता आणि सुरक्षेबाबतची आपली जबाबदारी पार पाडण्यात सुरक्षा परिषद अपयशी ठरली आहे, असं भारताच्या उप-स्थायी प्रतिनिधी योजना पटेल म्हणाल्या. सध्याची भू-राजकीय परिस्थिती पाहता परिषदेत आता निर्णायक आणि संरचनात्मक सुधारणा आवश्यक आहेत. तसंच, या सुधारणांमध्ये परिषदेच्या कायमस्वरुपी सदस्यत्वाचा विस्तार असावा, त्याशिवाय सुधारणेची प्रक्रियाच पूर्ण होणार नाही, असंही पटेल यावेळी म्हणाल्या.

<><><><><>

अंतराळवीरांचा समावेश असलेली मंगळ मोहिम पुढच्या महिन्यात ६ तारखेला सुरु होणार असल्याची माहिती अमेरिकेची आंतराळ संस्था नासाने दिली

आहे. या मोहिमेच्या उड्डाणाची रंगीत तालीम घेतल्यानंतर आणि या आधी निर्माण झालेल्या काही तांत्रिक अडचणी दूर केल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला असल्याचं नासानं म्हटलं आहे. या आठवड्याच्या सुरुवातीलाच अत्यंत शीत असलेलं प्रॉपेलंट यशस्वीरित्या रॉकेटमध्ये बसवण्यात  यश आलं आहे. सुरुवातीच्या काही चाचण्यांमध्ये या यानातून हायड्रोजन वायुची गळता आढळली होती. त्यामुळे या यानाचं उड्डाण पुढे ढकलण्यात आलं होतं.

**<><><><><>**

टी ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत सुपर एट गटाचे सामने आज पासून सुरु होत आहेत. पहिला सामना पाकिस्तान आणि न्यूझीलंड दरम्यान कोलंबो इथं होईल. सामना संध्याकाळी ७ वाजता सुरु होईल.

भारत, वेस्ट इंडीज, दक्षिण आफ्रिका, इंग्लंड,श्रीलंका, न्यूझीलंड, झिंबाब्वे, आणि पाकिस्तान हे देश सुपर एटमधे पोहोचले आहेत. भारताचा सामना उद्या दक्षिण आफ्रिकेबरोबर अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडीयमवर होणार आहे.

**<><><><><>**

कर्नाटकात बागलकोट जिल्ह्यात आज पहाटे झालेल्या अपघातात चौघांचा मृत्यू झाला असून इतर ८ जण जखमी झाले आहेत. जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. महाराष्ट्रातल्या ऊसतोडणी मजूरांना घेऊन जाणारं वाहन आज पहाटे बागलकोट जिल्ह्यातल्या जमखडी तालुक्यातल्या कट्टेकेरे इथं अचानक उलटून हा अपघात झाला. हे सर्व मजूर ऊसतोडणीसाठी जमखंडी परिसरात गेले होते.

**//<><><><><>//**